वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचा-यांचे शिस्तभंगविषयक
नस्ती सादर करतांना कार्यपध्दती अवलंबणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग - १
जिल्हा परिषद परिपत्रक क्र.साप्रवि१/आस्था२/४४ /२०२६
दिनांक स्वाक्षरीखाली नमूद प्रमाणे
२३.०१.२०२६

जिल्हा परिषद अहिल्यानगर अतंर्गत अधिनस्त वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचा-यांचे शिस्तभंगविषयक ई फाईल सादर करताना नस्तीमध्ये खाते प्रमुख स्पष्ट अभिप्रायासह सादर न करता मोघम पणे आदेशास्तव मान्यतेस्तव सविनय सादर करीत असलेची बाब वारंवार माझे निदर्शनास येत आहे.

तरी शिस्तभंग विषयक कारवाई विभागीय चौकशी पुस्तीका चौथी आवृत्ती १९९१ मधील तरतुदीनुसार व महाराष्ट जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने नस्ती सादर करणेकरिता जिल्हा परिषद स्तरावर एकसूत्रीपणा ठेवणेकामी खालील प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्यांत यावा.

| | |
|---|---|
| संपूर्ण नांव - | |
| सध्याचे पद, पदाचे वर्गवारी व वेतन संरचना - | |
| सेवेत हजर दिनांक - | |
| जन्मदिनांक - | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक - | |
| सेवेचा तपशील - (सेवा कालावधी व इतर अनुशंगीक माहिती) | |
| सेवेत पदोन्नती झाली असल्यास पदोन्नतीचा तपशील - | |
| ज्या पदावरील अनियमितते बाबतचा प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे ते पदनाम - | |
| यापूर्वी निलंबन झाले आहे कां - | |
| ज्या पदावर निलंबन झाले आहे त्या पदाचे पदनाम - | |
| यापूर्वीचा शिक्षेचा तपशील - | |
| शिस्तभंग विषयक शास्ती बाबत विश्लेषन - | |
| ज्ञापन, जोडपत्र १ ते ४ बजाविल्याचा दिनांक - | |
| सबंधीताचा खुलासा प्राप्त दिनांक - | |
| खुलासा समाधानकारक/ असमाधानकारक बाबत खाते प्रमुखाचा स्पष्ट अभिप्राय - | |
| विभागीय चौकशी सुरु केल्याचा दिनांक - | |
| सादरकर्ता अधिका-यांची नियुक्ती केल्याचा दिनांक - | |
| चौकशी अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक - | |
| अतिंम कारणे दाखवा नोटीस बजाविल्याचा दिनांक - | |
| खुलाश्याबाबत विभाग प्रमुखांचे स्पष्ट अभिप्राय - | |
| शिस्त भंगाच्या कारवाईच्या अनुषंगाने प्रस्तावीत शिक्षेबाबत स्पष्ट अभिप्राय - | |
| दस्तऐवज हायपर लिंक केलेले असावेत - | |

यापुढे निलंबन, दोषारोप, शास्ती इ.बाबी बाबत कर्मचा-याचा सेवातपशील उक्त नमूद प्रमाणे जोडण्यांत यावा. नस्ती सादर करताना विभाग प्रमुखांनी स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून नस्ती मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर करण्यांची दक्षता घ्यावी.

सदरचे परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आले असून त्यांचा संकेतांक क्रमांक 202601230400026 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-01-2026 11:22:48
आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रती,

खाते प्रमुख (सर्व)
जिल्हा परिषद अहिल्यानगर